**<u>प्रतिवादींतर्फे सा.क्र.२ चा अतिरिक्त सरतपास – श्री. एस.एस.इंजल वकील.</u>**

**१.** आता मला दि.०६/०५/२००२ चा खरेदी दस्त दाखवला. त्यावरती दस्तूर म्हणून माझी स्वाक्षरी आहे. त्याला नि.६३ देण्यात आलेले आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>वादी तर्फे उलट तपास – जी.टी.ठाकूर वकील.</u>**

**२.** मी १९७१ पासून दस्तलेखनाचे काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे कोणता दस्त कधी व कोणासाठी केला याची आठवण मला राहात नाही. मी दि.०६/०५/२००२ च्या दस्तासाठी साक्षी देणेसाठी आलो आहे. मी माझ्या शपथपत्रातील माहिती दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रात दि.०६/०५/२००२ च्या मजकुर नमूद नाही. मी दि.०६/०५/२००२ रोजी दस्त लिहून दिल्यानंतर रजिस्टर करणेसाठी पाठवून दिला होता.

**३.** आता मला माझ्या शपथपत्रातील वाचून दाखवलेला भाग अ मधील मजकुरातील दि.०६/०२/२००२ तारखे व्यतिरीक्त इतर मजकूर बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र.६३ चा दस्त आज प्रथमच न्यायालयात पाहिला आहे. मला जोती येसणे याच्या सरळ वारसांबाबत प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २४.११.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.